**महानगरपालिका / नगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या वाढीव क्षेत्राचा सिटी सर्व्हे होवून प्रापॅर्टी कार्ड तयार होणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : बैठक-२०२६/प्र.क्र.२६७/भूमापन**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ मे २०२६.

**प्रस्तावना :-**

राज्यातील अनेक महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये यापुर्वी नगर भूमापन योजना लागू करण्यात आलेली आहे. तथापि, महानगरपालिका व नगरपालिकांच्या हद्दीत कालांतराने वाढ झालेली असून, वाढीव हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांतील सर्वेनंबर / गट नंबरचे नगर भूमापन अद्याप पूर्ण झालेले नाही, अशा नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये अद्यापही ७/१२ अधिकार अभिलेख प्रचलित आहेत. तसेच ज्या महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात अद्यापही नगर भूमापन योजना लागू करण्यात आलेली नाही, अशा महानगरपालिका / नगरपालिकामधील धारकांच्या नोंदीही ७/१२ या अधिकार अभिलेखात घेण्यात येतात. परिणामी, त्या भागातील मिळकत धारकांना त्यांच्या मालमत्तेवरील स्पष्ट व निर्विवाद मालकी हक्क सिद्ध करण्यास अडचणी येत आहेत. त्या अनुषंगाने महानगरपालिका / नगरपालिका वाढीव हद्दीचे क्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील मिळकतींसाठी तसेच ज्या महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात अद्यापही नगर भूमापन योजना लागू करण्यात आलेली नाही, अशा महानगरपालिका / नगरपालिकामधील प्रचलित ७/१२ उतारे बंद करून त्याऐवजी “मिळकतपत्रिका (Property Card)” तयार करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील प्रकरण आठ “गावांच्या, नगरांच्या आणि शहरांच्या जागांतील जमीनी” मध्ये नमूद तरतुदींना अनुसरून महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील तसेच ज्या महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात अद्यापही नगर भूमापन योजना लागू करण्यात आलेली नाही, अशा महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात नगर भूमापन करुन मिळकतींचे ७/१२ उतारे बंद करून मिळकतपत्रिका तयार करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील मिळकतींची तसेच ज्या महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात अद्यापही नगर भूमापन योजना लागू करण्यात आलेली नाही, अशा महानगरपालिका / नगरपालिकामधील मिळकतपत्रिका तयार करण्याच्या अनुषंगाने संबंधित महानगरपालिका / नगरपालिके ने संबंधित जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडे प्रस्ताव सादर करावा. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मोजणीबाबतचा निधी जिल्हा वार्षिक निधी (DPC) अथवा नगरोत्थान योजनेमधून उपलब्ध करून जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडे भरणा करावा. तद्नंतर जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी सदर भागातील

मिळकतींचे नगर भूमापन करुन ७/१२ उतारे बंद करून मिळकतपत्रिका वितरीत करणेबाबतची कार्यवाही नियमानुसार करावी.

**३.** वरीलप्रमाणे महानगरपालिका / नगरपालिका हद्दीमध्ये नगर भूमापनाची कार्यवही करताना ज्या शासकीय जमिनीवर अतिक्रमण झालेले असेल, तेथे महसूल विभागाच्या शासन निर्णय दि.२५.०३.२०२६ मधील तरतूदींनुसार जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही केल्यानंतर जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांनी सदर मिळकतींसाठी मिळकतपत्रिका तयार करून वितरीत करावी. तसेच ज्या शासकीय जमिनीवर अतिक्रमण झालेले नसेल, अशा जमिनींच्या बाबतीत मिळकतपत्रिका शासनाच्या नावे तयार करावी.

**४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२६१२१६०४०३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.05.26 12:17:02 +05'30'

**(संजय बनकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत.**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास/गृहनर्माण) यांचे सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
८. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
११. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व उप संचालक भूमि अभिलेख
१६. सर्व जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
१७. निवडनस्ती (कार्यासन भूमापन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई